# विद्यार्थी विकास, राष्ट्रीय सेवा संचालक पदासाठी अर्ज प्रक्रिया

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाकडील संचालक, विद्यार्थी विकास आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदांकरिता नियुक्ती करण्यात येणार आहे. वरील पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी आवश्यक ती कागदपत्रे व ऑनलाईन अर्जाची छापील प्रत २२ जूनच्या आत विद्यापीठात सादर करण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे केले आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ अन्वये कलम २३ क व ख नुसार व महाराष्ट्र शासनाच्या वतीने १० ऑक्टोबर २०१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या परीनियमातील क्रमांक १ व २ नुसार या पदांवर नियुक्ती करण्यात येणार आहे. याबाबतची अधिकची माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.



‘स्त्री-भ्रूणहत्या : कारणे, उपाय आणि जनजागृती व संवाद ज्ञान यात्रा’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी डॉ. दौलत देसाई, महापालिकेचे आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, न्यायाधीश उमेशचंद्र मोरे, आदी.

# मूल्यशिक्षण शाळेतूनच मिळावे

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## जिल्हाधिकारी देसाई यांचे प्रतिपादन

‘पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारतात मूल्यशिक्षणाचा अभाव आहे. यामुळेच स्त्री आणि पुरुष असा भेदभाव केला जातो. स्त्री-पुरुष समानतेसाठी शाळेतूनच मूल्यशिक्षण मिळावे,’ असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे बुधवारी सायंकाळी ‘स्त्री-भ्रूणहत्या : कारणे, उपाय आणि जनजागृती व संवाद ज्ञान यात्रा’ या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश उमेशचंद्र मोरे, आदींच्या उपस्थितीत पुस्तकाचे प्रकाशन झाले. डॉ. अरुण पाटील, प्रा. सरिता मोरे आणि सारिका उमेशचंद्र मोरे यांनी पुस्तकाचे लेखन केले आहे.

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, ‘स्त्री-पुरुष समानच आहेत हे मनावर बिंबवण्यासाठी लहानपणापासूनच मुलांवर संस्कार होण्याची गरज आहे. मूल्यशिक्षणातून असे संस्कार देता येतात. पाश्चात्य देशांत अशी व्यवस्था असल्याने तिकडे स्त्री-पुरुषांमध्ये असमानता नाही.’

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ‘संवाद, संस्कार आणि नातेसंबंध जोपासणे आजच्या काळातील गरज आहे. स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी पालकांनी मुलांशी संवाद वाढवावा. अपेक्षित बदलासाठी तरुणाईवर संस्कार करणे आवश्यक आहे.’

आयुक्त कलशेट्टी म्हणाले, ‘मुलींना सन्मान देण्याची सुरुवात प्रत्येक घरातून व्हावी. अलीकडे यात बदल होत आहेत. मुलींना मुलांच्या बरोबरीने वागवले जात आहे. जिल्ह्यातील स्त्री-पुरुष जन्मदर समानतेसाठी जिल्हा प्रशासन आणि महापालिका जागृती करीत आहे. यात सर्व नागरिक आणि सामाजिक संस्थांनीही सहभाग घ्यावा.’

पोलिस अधीक्षक डॉ. देशमुख यांनीही पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केले. लेखकांपैकी प्रा. सरिका मोरे यांनी पुस्तक लेखनामागील संकल्पना करून पुस्तकाच्या निमित्ताने जिल्ह्यातील स्त्री-पुरुष जन्मदर आणि याकडे बघण्याची लोकांची मानसिकता वाचकांपर्यंत पोहोचणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. बी. सी. केम्पीपाटील, संवाद यात्रेचे समन्वयक पंढरीनाथ मांढरे, आदी उपस्थित होते. यावेळी पुस्तकनिर्मिती व प्रकाशनासाठी मदत करणारे मनिपद्म हर्षवर्धन, उमेश सूर्यवंशी, मृणालिनी शिंगे, प्रशांत सुतार, प्रा. सुभाष कोरे, प्रमोद सुतार यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अरुण पाटील यांनी स्वागत केले. न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांनी प्रास्ताविक केले. ॲड. बी. एम. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. गोविंद कोरगावकर धर्मादाय संस्थेच्या विश्वस्त पल्लवी कोरगावकर यांनी आभार मानले.

# ‘अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी’ विषयावर मोफत व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), कोल्हापूर स्थानिक केंद्र आणि तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने रविवारी (दि. २) ‘अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१९’ या विषयावर मोफत व्याख्यान आयोजित केले आहे. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात सकाळी ९.३० वाजता व्याख्यान होईल. कार्यक्रमात अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखांमधील संधी याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी विद्यार्थी, पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष इंजि. डॉ. पी. व्ही. कडोले, मनोज चव्हाण यांनी केले आहे.

सकाळ

# कायद्याची परीक्षा आता मराठीतूनही

## विद्या परिषदेचा ठराव मंजूर; एलएलबीकडे विद्यार्थ्यांचा कल



**लुमाकांत नलवडे** : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : मराठी भाषेतून कायद्याची परीक्षा देण्यास शिवाजी विद्यापीठातील विद्या परिषदेने नुकतीच मंजुरी दिली आहे. आता कोणालाही मराठीतून कायद्याच्या अभ्यासक्रमाची परीक्षा देता येणार आहे. आजपर्यंत केवळ इंग्रजी मधूनच हे शिक्षण असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली होती. या निर्णयामुळे एलएलबीकडे कल वाढण्याची शक्यता आहे. ठरावानुसार तत्त्वतः मंजुरी मिळाली आहे. आता पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे.

> कायद्याची पदवी परीक्षा इंग्रजी बरोबरच मराठी भाषेतून देण्यासाठी विद्या परिषदेने ठराव मंजूर केला आहे. पुढील प्रक्रिया सुरू आहे. लवकरात लवकर याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आहे. यासाठी काही कालावधी जाणार आहे. या जूनमध्ये हे शक्य होईल, असे वाटत नाही.
>
> \- डॉ. विलास नांदवडेकर, रजिस्टार.

> सध्या जे विद्यार्थी इंग्रजी भाषेतून परीक्षा देतात. त्यांनाही मराठी भाषेतून परीक्षा देता येईल. एकाच पेपरवर इंग्रजी आणि मराठीतून प्रश्न दिले जातील. मराठी उत्तरपत्रिका तपासण्यासाठी मंडळ तयार केले जाईल. मात्र, जोपर्यंत अधिकार मंडळाकडून याला मान्यता मिळत नाही, तोपर्यंत काहीच सांगता येत नाही.
>
> \- महेश काकडे, परीक्षा नियंत्रक.

अधिकार मंडळासह अन्य पूर्तता पूर्ण झाल्यास येत्या जूनपासूनही मराठीतून परीक्षा सुरू होऊ शकते.

शिवाजी विद्यापीठात २४ मे रोजी विद्या परिषद झाली. या परिषदेत कायद्याची परीक्षा मराठी आणि इंग्रजीतून देण्याचा १७ क्रमांकाचा

पान २ वर »

Kolhapur, Kolhapur-Today
30/05/2019 Page No. 1

सकाळ

# कायद्याची परीक्षा आता मराठीतूनही

» पान १ वरून

ठराव एकमताने मंजूर झाला. कायद्याचे शिक्षण मराठीतून मिळाल्यास त्याचा अनेकांना फायदा होईल. कायद्याबाबत अधिक जनजागृती होईल, यासाठी हा ठराव मंजूर केला आहे. स्टडी बोर्डकडून आलेल्या ठरावाला विद्या परिषदेने मंजुरी दिली. आता यानंतर इतर मान्यता घेऊन अन्य टप्प्यांवर निर्णय होतील. परीक्षेतील प्रश्नपत्रिका कोण तपासणार, त्यासाठी आवश्यक मंडळ तयार करावे लागणार आहे. यांसह अन्य प्रक्रिया सध्या विद्यापीठात सुरू आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास केवळ काही दिवसांचा कालावधी राहिला आहे. त्यामुळे या जूनपासून हा निर्णय अमलात येईल की नाही? याबाबत शिवाजी विद्यापीठाचे प्रशासन संभ्रमावस्थेत आहे. अधिकार मंडळाच्या आदेशानंतरच परीक्षा केव्हापासून मराठी होईल, हे निश्चित होईल. कायद्याची परीक्षा इंग्रजी बरोबरच मराठीतूनसुद्धा सुरू होणार यावर मात्र शिक्कामोर्तब झाल्याचे विद्यापीठातून सांगण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील कायद्याचा अभ्यासक्रम इंग्रजी बरोबरच मराठीतून सुरू व्हावा, यासाठी विद्यार्थी संघटनांनी कुलगुरूंना निवेदन देऊन विनंती केली होती. त्याची दखल घेऊन हा बदल केला आहे. यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होत आहे. शिवाजी विद्यापीठ बचाव कृती समिती आणि मनविसेचे कार्यकर्ते यांनी यासाठी प्रयत्न केले आहेत.

**४० गुणांवर उत्तीर्णची मागणी**

कायद्याची पदवी झाल्यानंतर असलेल्या एलएलबी स्पेशलसाठी शंभरपैकी पन्नास गुण मिळाल्यास उत्तीर्ण करण्याचा शिवाजी विद्यापीठाचा नियम आहे. मात्र इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ४०-४५ गुणांवर उत्तीर्ण केले जाते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. म्हणून इतर विद्यापीठाप्रमाणेच शिवाजी विद्यापीठाने नियमात बदल करून स्पेशल शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा पहिल्या दोनवर्षाप्रमाणेच तिसऱ्या वर्गासाठी (स्पेशल) ४० गुणांवर उत्तीर्ण करावे, अशीही मागणी विद्यार्थ्यांतून पुढे येत आहे.

सकाळ

# मूल्यशिक्षणामुळे स्त्रीभ्रूण हत्या बंद होतील

## जिल्हाधिकारी देसाई; 'स्त्रीभ्रूण हत्या : कारणे, उपाय आणि जनजागृती' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. २९ :** ''खऱ्या अर्थाने शिक्षण व्यवस्थेत बदल झाला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातूनच मूल्यशिक्षण दिले, तरच स्त्रीभ्रूण हत्या बंद होतील,'' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले.

'स्त्रीभ्रूण हत्या : कारणे, उपाय आणि जनजागृती,' 'संवाद ज्ञानयात्रा' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. शाहू स्मारक भवनात कार्यक्रम झाला. जिल्हाधिकारी श्री. देसाई यांच्या हस्ते 'स्त्रीभ्रूण हत्या : कारणे, उपाय आणि जनजागृती' पुस्तकाचे, तसेच शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते संवाद ज्ञानयात्रा पुस्तकाचे प्रकाशन झाले. महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी अध्यक्षस्थानी होते. तत्पूर्वी, मणिपद्म हर्षवर्धन, उमेश सूर्यवंशी, मृणालिनी शिंगे, पुस्तकाचे प्रकाशक प्रा. सुभाष कोरे, प्रमोद सुतार, श्री. सरदेसाई, प्रा. अन्नदाते आदींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते झाला.



**कोल्हापूर : स्त्रीभ्रूण हत्या कारणे, उपाय आणि जनजागृती, संवाद ज्ञान यात्रा पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी उपस्थित डावीकडून डॉ. अरुण पाटील, सौ. पल्लवी कोरगावकर, डॉ. अभिनव देशमुख, डॉ. केंपी पाटील, डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आदी.**

जिल्हाधिकारी श्री. देसाई म्हणाले, ''देशामध्ये शिक्षण व्यवस्थेत या गोष्टी गृहीत धरल्या जात नाहीत. पाश्चात्त्य देशांमध्ये मात्र शिक्षणातील मूल्यशिक्षणाला महत्त्व देतात. मुळातच ते लोक स्त्रीला वेगळं असं काही मानत नाहीत. स्त्रीचा आदर करतात. हे सर्व काही आपल्याकडे झालं पाहिजे; तरच स्त्रीभ्रूण हत्या होणारच नाहीत.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''स्त्रीभ्रूण हत्येच्या जागृतीच्या पलीकडेही आपण गेलं पाहिजे. आम्ही शिवाजी विद्यापीठात बेटी बचाओ मोहिमेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली. स्त्री ही मुलगी, आई, पत्नी असते. तीन रूपांमध्ये ती पुरुषाला भेटते. तरुणांना संस्कार दिले पाहिजेत. हे संस्कार आपल्या घरातूनच झाले पाहिजेत.''

डॉ. कलशेट्टी म्हणाले, ''शिक्षणाचा विचार रुजविला गेला पाहिजे. मनात जाणीवजागृती झाली पाहिजे. जिल्ह्यामध्ये स्त्री-पुरुष समानतेसाठी मोहीम एकत्रितपणे करूया.'' जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. सरिता मोरे, ॲड. बी. एम. पाटील, डॉ. अरुण पाटील, सौ. सारिका मोरे या लेखकांनी पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केले. विधी व सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायाधीश उमेशचंद्र मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पाटील यांनी स्वागत केले. ॲड. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. गोविंदराव कोरगावकर धर्मादाय संस्थेच्या विश्वस्त सौ. पल्लवी कोरगावकर यांनी आभार मानले. सिव्हिल सर्जन डॉ. केंपी पाटील, संवाद यात्रेचे समन्वयक पंढरीनाथ मांढरे, महावीर कॉलेजचे प्राचार्य डॉ. लोखंडे आदी उपस्थित होते.

## अभियांत्रिकी मार्गदर्शन कार्यशाळा

कोल्हापूर : दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स, कोल्हापूर शाखा व शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रिया व करिअरसंबधी रविवार (ता. २ मे) कार्यशाळा आयोजित केली आहे. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह येथे सकाळी ९.३० वाजता कार्यशाळेला सुरुवात होईल. प्रवेश प्रक्रियेचे नियम, ऑनलाइन नाव नोंदणीची प्रक्रिया, शाखा निवड पसंती, पसंती क्रम देताना घ्यावयाची काळजी, फी सवलत, आवश्यक कागदपत्रांविषयी माहिती देण्यात येणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी हे मार्गदर्शन करणार आहेत.